ARTHA Poona 4

उद्योगधंदे, बँकिंग, अर्थशास्त्र, व्यापार, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें एकमेव मराठी साप्ताहिक
स्थापना : १९३५

# अर्थ

" अर्थ एव प्रधानः" इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति ।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक बुधवारीं प्रसिद्ध होतें.
वर्गणीचे दर :
वार्षिक : ६ रु.
सहामाही : ३ रु.
किरकोळ : २ आ.
दुर्गाधिवास, पुणें ४.

LICENCED TO POST WITHOUT PREPAYMENT
Reg. No. B. 3484. Licence No. 53.

वर्ष ११ | पुणें, बुधवार तारीख १५ ऑगस्ट, १९५६ | अंक ३३

## विविध माहिती

**बोटींचीं एंजिनें तयार करा**—भारतीय सरकारनें परदेशीय कारखानदारांच्या साह्यानें बोटींना लागणारी यंत्रसामुग्री व एंजिनें तयार करण्याचा कारखाना काढण्याची व्यवस्था करावी असें श्री. एम. ए. मास्टर ह्यांनीं सुचविलें आहे. ते असेंहि म्हणाले कीं, १९६१ पर्यंत भारताला निदान ३०० सामुद्रिक एंजिनिअर्सची गरज लागेल.

**बहिऱ्यांना तांत्रिक शिक्षण**—ऑल इंडिआ फेडरेशन ऑफ दि डेफ ह्या संस्थेच्या कार्यकारी कमिटीची बैठक दिल्ली येथें भरली होती. बहिऱ्यांना तांत्रिक शिक्षण देण्यासाठीं एक मध्यवर्ती शिक्षणसंस्था काढण्याचें कमिटीनें ठरविलें आहे. संस्थेसाठीं १ लाख रुपये खर्च येईल. शिक्षणाच्या काळांत विद्यार्थ्यांना जगण्यापुरतें वेतनहि देण्यांत येईल.

**राज्यपुनर्रचना कमिशनचा खर्च**—मध्यवर्ती सरकारनें नेमलेल्या राज्यपुनर्रचना कमिशनच्या कामासाठीं १०,२२,२६३ रुपये खर्च आला, अशी माहिती राज्यसभेंत सरकारतर्फे सांगण्यांत आली. सरदार पण्णीकर ह्यांनीं प्रवासखर्च म्हणून ११,५५६ रुपये घेतले. अध्यक्ष श्री. फझलअली ह्यांनीं ९,३४६ रुपये घेतले आणि पं. कुंझरू ह्यांनीं ५,०४६ रुपये घेतले.

**पुरांना आळा घालण्याचे प्रयत्न**—ठिकठिकाणीं येणाऱ्या पुरांना आळा घालण्यासाठीं चालू पावसाळा संपल्यानंतर सौराष्ट्र सरकारनें ४४ कामें हातीं घेण्याचें ठरविलें आहे. जामनगर शहराचा पुरापासून बचाव करण्याची योजना सर्वांत मोठी असून तीसाठीं ७,३८,००० रुपये मंजूर करण्यांत आले आहेत. राजकोटच्या बचावाच्या योजनेसाठीं ३,२४,००० रुपये खर्च करण्यांत येणार आहेत.

**बोटींच्या तुटवड्याचा परिणाम**—भारतीय सरकारनें आपल्या विकासाच्या योजना पार पाडण्यासाठीं युरोप व अमेरिका ह्यांच्याकडून बरीच यंत्रसामुग्री मागविलेली आहे. पण ही यंत्रसामुग्री वाहतुकीच्या बोटींची टंचाई असल्यामुळें बंदरांतून पडून आहे. ती वेळेवर हातीं न आल्यास विकासयोजनांच्या कार्यांत बराच अडथळा उत्पन्न होईल.

**मध्य भारतामधील कंपन्यांचा कारभार**—इंदूर येथील स्टॉक अँड शेअर-होल्डर्स असोसिएशचे उपाध्यक्ष श्री. तिवाटिआ ह्यांनीं मध्यभारतामधील कंपन्यांत मॅनेजिंग एजंटसच्या जागीं मॅनेजिंग डायरेक्टर्स नेमण्याची प्रथा वाढत आहे, अशी तक्रार केली आहे. ह्या बदलामुळें भागदारांत काळजीचें वातावरण उत्पन्न झालें आहे. परंतु कंपन्याच्या कायद्याच्या कलमांना धुडकाऊन लावण्याच्या वृत्तीचा बंदोबस्त करण्यांत येईल, असें आश्वासन सरकारतर्फे देण्यांत आलें आहे.

**नेपाळचा पंचवार्षिक कार्यक्रम**—नेपाळमध्यें पहिला पंचवार्षिक कार्यक्रम अंमलांत आणण्यास लवकरच प्रारंभ होणार आहे. कार्यक्रमांत वाहतुकीच्या व दळणवळणाच्या साधनांवर विशेष भर देण्यांत आला आहे. भारत व अमेरिका ह्या देशांनीं नेपाळला सुमारें २० कोटी रुपयांची मदत करण्याचें ठरविलें आहे.

**पाकिस्तान-अमेरिका करार**—पाकिस्तान व अमेरिका ह्यांच्या दरम्यान एक करार करण्यांत आला. अमेरिकेकडून पाकिस्तानला अन्नधान्य व इतर शेतीचा माल मिळून सुमारें २२ कोटी रुपये किंमतीच्या वस्तू मिळणार आहेत. पूर्व पाकिस्तानांत व पश्चिम पाकिस्तानांत ह्या वस्तूंचा तुटवडा भासत असल्यानें ही मदत देण्यांत येत आहे.

**आंध्र राज्यांत निघणारे उद्योगधंदे**—दुसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमाच्या कालांत आंध्र राज्यांत ठिकठिकाणीं नवीन उद्योगधंदे काढण्याचें राज्य सरकारनें ठरविलें आहे. सायकलींचे व रेडिओंचे सुटे भाग, तांब्याची तार, १६ एम. एम. चित्रपट दाखविणारे दिवे, इत्यादि वस्तू तयार करण्याचे कारखाने काढण्याचा सरकारचा विचार आहे.

**रशिअन विमानाचा प्रवास**—जेट एंजिनांवर चालणाऱ्या 'टीयू १०४' ह्या जातीच्या रशिअन विमानानें मास्को ते इर्कुटस्क हा ३,२५० मैल लांबीचा प्रवास साडेआठ तासांत पूर्ण केला, असें जाहीर करण्यांत आलें आहे. हें विमान वाहतुकीचें आहे. हेंच अंतर कापण्यास रेल्वेला ६ दिवस लागतात. विमानाचा प्रवास ३५,००० फूट उंचीवरून झाला.

**दूधदुभत्याच्या धंद्याचा अभ्यास**—डेन्मार्क देशांत दुधाचें उत्पादन व शुद्धीकरण ह्या विषयांचा अभ्यास करण्यासाठीं एक शिबीर भरविण्यांत आलें आहे. ह्या शिबिरांत भाग घेण्यासाठीं भारतामधील निरनिराळ्या राज्यांतून १० प्रतिनिधी गेले आहेत. पश्चिम बंगालमधून तीन आणि मुंबई राज्यांतून दोन प्रतिनिधी निवडण्यांत आले आहेत.

**स्वित्झरलंडच्या बँकांचा नकार**—इजिप्तमधील आस्वान येथें बांधावयाच्या नव्या धरणासाठीं सुमारें ४६·४ कोटी पौंड खर्च येईल. ही रक्कम स्विस बँकांनीं पुरवावी, असे प्रयत्न करण्यांत आले होते. पण एवढी मोठी रक्कम खाजगी रीत्या उभारतां येणें अशक्य असल्यानें इजिप्तची मागणी अमान्य करण्यांत आली.

**किंमती कमी केल्या**—रशिआच्या व्यापारमंत्र्यांनीं बऱ्याच गरजेच्या वस्तूंच्या किंमती कमी करण्यांत आल्याचें जाहीर केलें आहे. सिगारेटस्, खेळणीं, टेलिव्हिजन सेटस्, सहली करण्याच्या बोटी, इत्यादि वस्तूंच्या किंमती तावडतोब कमी करण्याचा हुकूम त्यांनीं काढला आहे.

### १९ ऑगस्ट, वसतिगृह दिन

लष्करी विभागांतलि मुला-मुलींच्या वसतिगृहांच्या मदतीसाठी १९ ऑगस्ट रोजीं वसतिगृह दिन पाळण्यांत येणार आहे. मुंबई राज्यांत अशीं एकूण २० वसतीगृहें आहेत, त्यांत एक मुलींचें वसतिगृहि आहे. ज्या जिल्ह्यांत वसतिगृहें नसतील त्यांना जिल्ह्यांतील जमलेल्या निधीचा निम्मा भाग देण्यांत येईल. ही रक्कम त्या त्या जिल्ह्यांतील माजी सैनिकांच्या लायक अशा मुलांना सरकार-मान्य स्थानिक शिक्षण संस्थांच्या वसतिगृहांत प्रवेश मिळवून देण्यासाठी व त्यांच्या शिक्षणासाठीं खर्च केली जावयाची आहे. ज्या जिल्ह्यांत मिलिटरी वसतिगृहें असतील तेथें जिल्ह्यानें जमविलेल्या निधीपैकी चौथ्या हिश्शाची रक्कम त्याला परत करण्यांत येईल.

मुंबई राज्यांतील २० वसतिगृहांतून दरसाल ५०० मुलांना प्रवेश देण्यांत येतो. चालू सालीं पुण्यास जागा भाड्यानें घेऊन वसतिगृह सुरू करण्यांत आलें आहे. या वसतिगृहांची व्यवस्था मुंबई राज्याच्या मुख्य मंत्र्यांच्या देखरेखीखाली पहाण्यांत येत असते.

गेल्या वर्षीं हा 'वसतिगृह दिन' १८ एप्रिल रोजीं पाळण्यांत आला होता. यांत ६२,४५० रु. रक्कम जमली होती. यंदाच्या वसतिगृहदिनानिमित्त ५ रु., १ रु. व आठ आण्यांचीं निरनिराळ्या रंगांचीं कार्डे विक्रीसाठी काढण्यांत येणार आहेत.

### बँकांतील खात्यांची गुप्तता

लेबेनॉन सरकारनें एक कायदा करून, न्यायकोर्टांना सुद्धां खातेदारांच्या खात्याची माहिती देण्यास बँकांना बंदी केली आहे. प्रत्येक खातें फक्त नंबरानें ओळखलें जावें आणि खात्याच्या मालकाचें नांव फक्त बँकेच्या प्रमुखालाच माहीत असावें, अशी योजना करण्यांत आली आहे.

### श्री. चंदावरकर, स्टेट बँकेंतून बँक ऑफ इंडियांत

श्री. विठ्ठलराव चंदावरकर ह्यांनीं स्टेट बँक ऑफ इंडियाच्या संचालकत्वाचा राजीनामा दिला आहे. १९ ऑगस्टपासून तो अमलांत येईल आणि त्यानंतर ते बँक ऑफ इंडियाच्या संचालक मंडळांत जातील, असें समजतें.

### ५ विमा कंपन्यांत ७० लक्ष रुपयांची अफरातफर

आयुर्विम्याचें राष्ट्रीयीकरण केल्यानंतर, १९ जानेवारी, १९५६ रोजीं कस्टोडिअन्सकडे विमा कंपन्यांची तात्पुरती व्यवस्था देण्यांत आली. तेव्हां त्यांना ७० लक्ष रुपयांच्या अफरातफरीचीं ५ प्रकरणें आढळलीं आहेत. तीं अशीं :—

| | |
|---|---|
| प्रेसिडेन्सी लाइफ इं. कं. | ३० लक्ष रु. |
| पॅलॅडियम अॅ. कं. | ५ लक्ष रु. |
| वंगलक्ष्मी इं. कं. | १३ लक्ष रु. |
| आदर्श विमा कं. | १५ लक्ष रु. |
| हिंदुस्तान आयडिअल कं. | ११,००० रु. |

इतर कांहीं प्रकरणांचे बाबतींत चौकशी चालू आहे. वरील पांच कंपन्यांचे बाबतींत, त्या कंपन्यांचा कारभार हातीं घेतांना तेवढ्या रकमेचे रोखे कस्टोडिअन्सना उपलब्ध होऊं शकले नाहींत.

## महाराष्ट्र रीजनल को-ऑपरेटिव्ह स्कूल, पुणें-१

**( नं. १० बी. जे. रोड, टाटा लॉज, पुणें-१ )**

विद्यालयाचा पुढील शिक्षणवर्ग दिनांक १ ऑक्टोबर १९५६ रोजीं सुरू होईल. विद्यालयांत सुपरवायझर, बँक इंस्पेक्टर, असिस्टंट को-ऑपरेटिव्ह ऑफिसर, खरेदी-विक्री संघ आणि विविध कार्यकारी सहकारी सोसायटी वगैरे संस्थांचे सेक्रेटरी या दर्जाचे नोकरवर्गांना शिक्षण दिलें जातें. विद्यालयाचा शिक्षणक्रम सहा महिने मुदतीचा आहे. सहकारी सोसायट्या व सहकारी खात्यामध्यें नोकरी करणाऱ्यांना प्रवेश देतांना अधिक पसंति दिली जाते. शिवाय जागा शिल्लक असल्यास एस. एस. सी. उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना प्रवेश मिळूं शकेल. सहकारी सोसायटींत काम करणारे उमेदवार एस. एस. सी. उत्तीर्ण नसल्यास त्यांनीं सहकारी संस्थेंत कमींत कमी तीन वर्षें नोकरी केली असली पाहिजे.

वर्गातील शिक्षणाचे मुदतींत दरमहा रु. ४० प्रमाणें एकूण ऐंशी विद्यार्थ्यांना विद्यावेतन देण्यांत येईल; आणि प्रात्यक्षिक शिक्षणाचे वेळीं दरमहा रु. ३० प्रमाणें प्रवासभत्ता देण्यांत येईल. विद्यावेतन फक्त सहकारी खात्याचे व सहकारी संस्थांचे उमेदवारांना दिलें जाईल. **खाजगी उमेदवारांना विद्यावेतन मिळणार नाहीं.**

सहकारी संस्थांचे उमेदवारांनीं, आपल्या संस्थेच्या ठरावाचे नकलीसह, प्रवेश-अर्ज आपल्या जिल्ह्याचे, जिल्हा सहकारी बोर्डामार्फत आमचेकडे दिनांक ३१ ऑगस्ट १९५६ पूर्वी पोहोंचतील अशा अंदाजानें पाठवावे. **परस्पर आलेल्या आणि वरील तारखेनंतर आलेल्या अर्जाचा विचार केला जाणार नाहीं.** खाजगी उमेदवारांनीं आपले अर्ज परस्पर विद्यालयाकडे पाठवावे. **प्रवेश अर्जासोबत प्रवेश फी पाठवूं नये.** खाजगी उमेदवारांना प्रवेश मिळाल्यानंतर त्यांनीं विद्यालयाची फी रु. ४० ताबडतोब भरणें आवश्यक आहे.

विद्यालयाचे फॉर्म व माहितीपत्रकें विद्यालयाचे कचेरींत, सुट्टीचे दिवसांखेरीज, रोज ११॥ ते ५ चे दरम्यान मिळूं शकतील. अर्जाची मागणी करतेवेळीं आठ आणे रोख भरणें किंवा आठ आण्यांचीं पोस्टाचीं तिकिटें पाठविणें आवश्यक आहे.

मा. वि. मदाने
सुपरिन्टेन्डेन्ट.

**अंबर चरख्यांची निर्मिति**—राजस्थान खादी बोर्डानें दुसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमाच्या अवधींत ३,००,००० अंबर चरखे तयार करण्याचें ठरविलें आहे. राजस्थानमध्यें २५ जिल्हे आहेत. ह्या प्रत्येक जिल्ह्यामध्यें चरखा वापरण्याचें शिक्षण देणारें एकेक केंद्रहि स्थापन करण्यांत येणार आहे. हा सर्व कार्यक्रम टप्प्याटप्प्यानें अंमलांत आणण्यांत येणार आहे.

**जहागिरदारांना नुकसान भरपाई**— मध्यभारतामध्ये जहागिरी रद्द करण्यांत आल्यानंतर जहागिदारांना देण्यांत यावयाच्या नुकसानभरपाईच्या दुसऱ्या हप्त्याची रक्कम ३० लक्ष रुपयांची ठरविण्यांत आली आहे. राज्यांतील महसूलविषयक कारभार आतां अधिक कार्यक्षमतेनें चालविण्यांत येत आहे असें सरकारचें म्हणणें आहे.

# अर्थ

बुधवार, ता. १५ ऑगस्ट, १९५६





संस्थापक :
प्रो. वामन गोविंद काळे

संपादक :
श्रीपाद वामन काळे


## हिंदी बँकांविषयीं माहितीचे तक्ते

रिझर्व्ह बँक दरसाल हिंदी बँकांविषयीं तपशीलवार माहिती देणारें पुस्तक* प्रसिद्ध करीत असते. त्याप्रमाणें, १९५५ विषयक वार्षिक नुकतेंच प्रसिद्ध झालें आहे. त्यांत सर्व बँकांचा एकत्रित आढावा तर असतोच, पण त्याबरोबरच प्रत्येक बँकेविषयींहि तपशील दिलेला असतो. परिशिष्टें, ग्राफ, नकाशे, इत्यादींच्या साहाय्यानें माहिती सुबोध केलेली असते.

गेल्या वर्षातील आर्थिक प्रगति बँकांकडील ठेवी, त्यांचीं कर्जें व त्यांची गुंतवणूक, ह्यांत प्रतिबिंबित झालेली स्पष्ट दिसते. जॉ. स्टॉक बँकांकडील ठेवींत ९२ कोटी रुपयांची भर पडली. त्यापैकीं शेडयूल्ड बँकांकडील ठेवींतच ८७ कोटी रुपयांची वाढ झाली. बिगर-शेडयूल्ड बँकांकडील ठेवींनीं ५ कोटी रुपयांची वाढ दाखविली. १९५४ मध्यें, मुदती ठेवींपेक्षा चालू खात्यावरील ठेवींत ज्यास्त वाढ झाली होती; १९५५ मध्यें चालू खात्यांतील ठेवींत २२ कोटी रुपयांची, तर मुदती ठेवींत ५३ कोटी रुपयांची वाढ झाली. १ लक्ष रुपयांपेक्षा ज्यास्त वसूल भांडवल अधिक गंगाजळी असलेल्या सहकारी बँकांकडील ठेवी १६ कोटी रुपयांनीं वाढल्या. बिगर-शेडयूल्ड बँकांचे मानानें सहकारी बँकांनीं ठेवींचे बाबतींत दाखविलेली प्रगति विशेष उल्लेखनीय आहे. जॉ. स्टॉक बँकांनीं दिलेलीं कर्जें ९२ कोटी रुपयांनीं वाढलीं, तर गुंतवणुकींत ४२ कोटी रुपयांची भर पडली

जॉइंट स्टॉक बँकांच्या कचेऱ्या १९५४ मध्यें २१ नें वाढल्या होत्या; १९५५ मध्यें त्यांत ६३ ची भर पडली शेडयूल्ड बँकांच्या कचेऱ्यांत ९३ नें वाढ झाली, पण बिगर-शेडयूल्ड बँकांनीं ३० कचेऱ्या कमी केल्या. सहकारी बँकांची संख्या व त्यांच्या कचेऱ्यांची संख्या, ह्या दोहोंतहि वाढ झाली. शेडयूल्ड बँकांच्या कचेऱ्यांपैकी ५४% कचेऱ्या ५०,००० वस्तीपेक्षा मोठ्या शहरांतूनच होत्या. बिगर-शेडयूल्ड बँकांच्या बाबतींत तें प्रमाण ३३% पडलें.

भारताबाहेरील शाखांच्या कारभारांत पीछेहाटच दिसून आली २ कचेऱ्या नव्यानें उघडल्या, पण एकूण संख्या १ नें उतरून ती १०६ झाली. ठेवींत ५ कोटी रुपयांची घट होऊन दिलेलीं कर्जेंहि ८ कोटी रुपयांनीं कमी झालीं.

शेडयूल्ड बँकांचें उत्पन्न १९५४ चे मानानें ४.२ कोटी रुपयांनीं वाढलें. खर्चहि ३.९ कोटी रुपयांनीं वाढला. म्हणजे, निव्वळ नफा ३३ लक्ष रुपयांनीं सुधारला. एक्सचेंज बँकांच्या निव्वळ नफ्यांत ५८ लक्ष रुपयांची वाढ झाली. त्यांचें उत्पन्न १.९ कोटी रुपयांनीं वाढलें पण खर्च १.४ कोटी रुपयेच अधिक झाला. खर्चाचें उत्पन्नाशीं प्रमाण शेडयूल्ड बँकांचे बाबतींत ८२% पडलें. एक्सचेंज बँकांचें तें ७७% होतें.

* स्टॅटिस्टिकल टेबल्स रिलेटिंग टु बँक्स इन इंडिया, १९५५.

## नद्या वेठीला धरण्याची योजना

त्रावणकोर-कोचीन राज्यांतील बहुतेक नद्या आपला जलौघ हिंदी महासागरांत सोडून मोकळ्या होतात. ह्या नद्यांच्या पाण्याचा जास्तींत जास्त उपयोग करून घेण्यासाठी राज्य-सरकारनें एक मोठी योजना तयार केली आहे. राज्य सरकारचे सल्लागार श्री. राव ह्यांनीं ह्यासंबंधीं बोलतांना असें सांगितलें, कीं राज्यांतील मोठ्या नद्यांचा कशा प्रकारांनीं उपयोग करून घेतां येईल तें तपासून पहाण्यासाठी खास अधिकारी नेमण्यांत आले आहेत. अलेप्पीजवळ मोठें धरण बांधण्याचा सरकारचा विचार आहे. धरणाच्या कामासाठी पुणें येथील संशोधन-केंद्रांत खास संशोधन करण्यांत येत असून राज्यांतील स्थानिक एंजिनिअर्स त्या कार्यांत मदत करीत आहेत. हें धरण उभारलें गेलें तर त्यामुळें राज्याच्या विकासाला चांगली चालना मिळेल असा अंदाज आहे. चालू वर्षीं राज्यांत पाटबंधाऱ्यांचीं ४ मोठीं कामें पूर्ण करण्याचा सरकारचा विचार आहे. ह्या कामाची सुरवात पहिल्या पंचवार्षिक कार्यक्रमाच्या कालांत करण्यांत आलेली आहे. त्रावणकोर-कोचीन राज्याला लागून असलेल्या मद्रास राज्यांत सह्याद्रीच्या पूर्वेला बराच भूभाग असा आहे कीं पाण्याच्या अभावीं तो कोरडा असतो. ह्या भागाला पाणीपुरवठा करण्यासाठी त्रावणकोर-कोचीन राज्यांतील नद्यांच्या पाण्याचा उपयोग करून देण्यांत यावा, अशी मद्रास सरकारची मागणी आहे. त्रावणकोर-कोचीन आणि मद्रास ह्या सरकारांच्या दरम्यान अशा पाणीपुरवठ्याबद्दल एक करार झालेलाहि आहे पेरियार नदीच्या पाण्यासंबंधीं असा करार झालेला आहे. इतर नद्यांच्या पाण्याबद्दलहि मद्रास सरकार मागणी करीत आहे. पण अद्याप कांहीं निर्णय घेण्यांत आलेला नाहीं.

**आंध्र वेअरहौसिंग कॉर्पोरेशन**--आंध्र सरकार लवकरच स्टेट वेअरहौसिंग कॉर्पोरेशनची स्थापना करणार आहे. कॉर्पोरेशनचें अधिकृत भांडवल १ कोटी रुपयांचें असेल. त्यापैकीं ५० टक्के भांडवल सेंट्रल वेअरहौसिंग कॉर्पोरेशन पुरविणार आहे. शेतीच्या मालासाठी गुदामे बांधणें आणि त्याच्या वाहतुकीची व्यवस्था करणें, हें कार्य कॉर्पोरेशन करील.

**अणुशक्तीवर चालणारी बोट**—अमेरिकन सरकारच्या एका अधिकाऱ्यानें असें जाहीर केलें आहे, कीं अणुशक्तीवर चालणारी पहिली अमेरिकन व्यापारी बोट १९५९ मध्यें तयार होईल. अणुभट्टीवर चालणारीं एंजिनें बांधण्यास तीन वर्षांचा काळ लागेल. बोटीचा बाकीचा सर्व भाग पुढच्याच वर्षीं तयार होणार आहे.

**मध्यप्रदेशांत साखरेचा कारखाना**—दुसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमाच्या अवधींत मध्यप्रदेशांत सहकारी तत्त्वावर चालविण्यांत येणारा साखरेचा कारखाना काढण्यांत येणार आहे. कारखान्यांत रोज ८०० टन ऊस गाळण्याची यंत्रसामुग्री बसविण्यांत येणार आहे. एकूण ४० लाख रुपये भांडवल लागणार असून त्यापैकीं १८ लाख कर्जाऊ मिळणार आहेत.

महाराष्ट्रीयांनो,

## सधनतेची शपथ घ्या !

कै. लोकमान्य टिळकांनीं आपलें सर्व आयुष्य भारताच्या कल्याणासाठी वेंचलें. भारताचाच भाग महाराष्ट्र असल्यानें तो दरिद्री व असधन राहिला तर त्यांचे आत्म्याला शांतता लाभणार नाहीं. महाराष्ट्र प्रवृत्तिमार्गावर जावा, यासाठी त्यांनीं अनेक पुस्तकांचा आधार घेऊन गीता प्रवृत्तिपर आहे हें सिद्ध केलें. त्यावेळीं थोडासा वाद माजला पण नंतर सर्वांना तें मान्य झालें.

श्रीमान् होण्याचें वरदान ईश्वरानें फक्त युरोपियन अगर गुजर-मारवाड्यांना दिलें आहे, असें नाहीं. योग्य मार्गानें जातील व जी एक पद्धत ठरली आहे, त्याचप्रमाणें वागतील तर मराठ्यांचे बाबतींत लक्षाधिश होणें हा नियम व अपयश येणें हा अपवाद ठरेल. यासाठी "आपण लक्षाधिश होणार, सधन होणार व श्रीमान् होणार" अशी शपथ घ्यावी; तरच आपण लोकमान्यांचे अभिमानी ठरूं.

आपले देशांत औद्योगिकदृष्ट्या कारखाना चालविणें हाच यज्ञ. याच यज्ञांत आळस, अदूरदर्शीपणा, लहर, सोकाजीपणा, अदक्षता, वगैरे दुर्गुणांचें हवन करावें लागतें, व कारखान्यांतील नोकर, सरकार, नगरपालिका, देशी संस्था, शेअरहोल्डर, वगैरे देवतांचे मुखांत द्रव्यरूपानें सारख्या आहुति द्याव्या लागतात व त्यांना तृप्त करावें लागतें. अशा रीतीनें सर्वांना देऊन जें शेष राहील त्याचेंच सेवन चालकानें करावें लागतें. सारांश, कोणताहि काल असो, यज्ञकर्म करावेंच लागतें. फक्त कालमानानें त्याचीं स्वरूपें निराळीं असतील. असे यज्ञ करून किंवा कारखाने घालून देशाचें वैभव वाढविणें हें पुण्यकर्म आहे, तो पुरुषार्थ आहे. पण दुर्दैवाची गोष्ट अशी कीं, गेलीं कित्येक शतकें मराठे वैभवाला, सधनतेला नांवें ठेवण्यांतच फुशारकी मारतात. लक्ष्मीची निंदा जो करील किंवा जे करतील, त्यांचे घरीं लक्ष्मी कशी नांदेल? येथें एक ध्यानीं घेतलें पाहिजे कीं, वैभव व संपदा वाईट नसून त्याचा गैरवापर करणारा वाईट असतो. वैभव व अनाचार यांचें सान्निध्य असतें ही भ्रामक कल्पना आहे. सर्व गोष्टी वैभव धारण करणाऱ्या व्यक्तीचे विचारावर अवलंबून असतात. तेव्हां आमच्या मराठे बांधवांनीं वैभवाला नांवें ठेऊं नयेत. वैभव आलें कीं अनाचार आलाच, अशा खोट्या कल्पना करून घेऊन गांगरूं नये.

आतां दारिद्र्याचा थोडा विचार करूं. जो दरिद्री आहे तो तरी सद्गुणी असतो कां? "बुभुक्षितः किन्न करोति पापम्" या न्यायानें ज्याच्या इंद्रियांची तृप्ति झाली नाहीं, ज्याचीं इंद्रियें दारिद्र्यामुळें वखवखलेलीं आहेत, त्याचे हातून पाप घडणें सहाजिक आहे. दरिद्री सुदामदेव हरिभक्त होता यावरून जेवढे दरिद्री तेवढे हरिभक्त असतात असें म्हणतां येणार नाहीं. गरिबी हा सद्गुण नव्हे. तें पाप आहे, ती शिक्षा आहे, तो महारोग आहे! असें समजून त्याच्या निवृत्तीसाठी झटलें पाहिजे!

आजवर मराठ्यांनीं "अर्थमनर्थं भावय नित्यम्" हें तत्त्व पोटाशीं धरून दारिद्र्यांत दिवस काढले, त्यामुळें कोणते कोणते सद्गुण प्राप्त झाले याचा आढावा घेतला तर—

मुलें भुकेलीं करिति तंटा, घरांत वाजे नकार घंटा ॥

अशीच स्थिति महाराष्ट्रांत दिसते. एकदां लेखक एकाचे घरीं गेले होते. घरांत प्रवेश करतांच खडूनें समोरच्या भिंतीवर असें लिहिलें होतें कीं, "चहा हवा का हो! नकोच असेल!!"

हा प्रश्न व त्याचें लगेच दिलेलें उत्तर पाहून, केवढें दारिद्र्य महाराष्ट्रांत नांदत आहे याचा साक्षात्कार होतो व भीति वाटते.

वैभव आलें कीं अनाचार आला हें मत खोडून काढण्यासाठी आपले पूज्य देव त्यांच्याकडे वाचकांनीं लक्ष द्यावें. आपले रामराय, श्रीकृष्णपरमात्मा व शेषशायी भगवान ह्यांचेकडे पाहिले तर रत्नजडित सिंहासन, त्यावर शोभे रघुनंदन, असें त्यांचें वर्णन आहे. पण ते रत्नजडित सिंहासन अनाचार निर्माण करीत नाहीं. श्रीकृष्णभगवानांची सोन्याची द्वारका अनाचारानें लडबडली नाहीं. शेषशायी भगवानांचे पायापाशीं लक्ष्मी आहे पण तेथेंहि वाईट असें कांहींहि नाहीं. यावरून वैभवांत वाईटपणा असून तो वापरणाराचे वृत्तींतच असतो. ती वृत्ति चांगली ठरणें आपल्या हातीं आहे.

प्रत्येकानें षट्कर्में करावीं अशी आर्यधर्माची आज्ञा आहे. ती म्हणजे अध्ययन-अध्यापन, यजन-याजन, दान व प्रतिग्रह अशीं तीं सहा कर्में होत. दान करण्याच्या उपदेशाच्या मागें सधन व श्रीमान् होऊनच दान करावें, असा गर्भितार्थ आहे. सधन व्हावें, वैभव मिळवावें, शंभर यज्ञ करून किंवा अनेक कारखाने घालून इंद्र होण्यासहि धर्माची संमति आहे. पण दुर्दैवाची गोष्ट ही कीं, मराठ्यांनीं सधन होण्याचा अट्टाहास न करितां व दान करून प्रतिष्ठित व्हावें, ही इच्छा न धरतां, प्रतिग्रह म्हणजे भिक्षा मागण्याचा सोपा मार्गच चहूंदिशीं उचलला. पण हें पंगुपणाचें लक्षण आहे व तें शूर मराठे वीरांनीं टाकलेंच पाहिजे.

—उद्योगरत्न वि. रा. वेलणकर,
("पुरुषार्थ" टिळक अंकांत)

## वैद्यकीय मदतीसाठी रेल्वेचा फिरता डबा

पश्चिम रेल्वेवर असणाऱ्या छोट्या स्टेशनांत कामें करणाऱ्या नोकरांना वैद्यकीय मदत तत्परतेनें देतां यावी म्हणून रेल्वे-अधिकाऱ्यांनीं एक प्रयोगात्मक योजना अंमलांत आणण्याचें ठरविलें आहे. वैद्यकीय मदतीच्या साधनांनीं परिपूर्ण अशा प्रकारचा एक खास डबा परळ येथील रेल्वेच्या कारखान्यांत बांधण्यांत येत आहे. ह्या डब्यांत डॉक्टर आणि इतर वैद्यकीय नोकरवर्ग ह्यांच्यासाठी वेगवेगळ्या खोल्या तयार करण्यांत येतील. त्याशिवाय स्वयंपाकगृह, रोग्यांना थांबण्यासाठी खोली, रुग्णांची खोली व औषधें देण्यासाठी एक खोली ह्यांचीहि सोय करण्यांत येणार आहे. डबा प्रथमतः कोटा ते नागदा ह्या स्टेशनांच्या दरम्यान फिरता ठेवण्यांत येणार आहे. कोटा आणि गंगापूर ह्या रेल्वे रस्त्यावरहि तो फिरेल. आपल्या फिरतींत डबा ३६ छोट्या छोट्या स्टेशनांना भेटी देईल व वैद्यकीय मदत देईल. प्रत्येक स्टेशनाला आठवड्यांतून दोन भेटी दिल्या जातील. ज्या रेल्वे-स्टेशनांना रेल्वेच्या इस्पितळांचा अगर दवाखान्यांचा फायदा मिळत आहे, अशा स्टेशनांना डब्याचा उपयोग करतां येणार नाहीं. कांहीं दिवसांपूर्वी दिल्ली येथें रेल्वेजच्या चीफ मेडिकल ऑफिसर्सची परिषद भरविण्यांत आली होती. परिषदेंत असे फिरते डबे ठेवण्याचा विचार करण्यांत आला होता. परिषदेंत घेतलेल्या निर्णयास अनुसरूनच वरील उपक्रम चालू करण्यांत येणार आहे. तो यशस्वी झाल्यास अशाच पद्धतीचे आणखी कांहीं धावते डबे सुरू करण्यांत येतील. ह्या उपक्रमामुळें रेल्वे नोकरांची कार्यक्षमता वाढून इस्पितळांतील गर्दी कमी होईल असा अंदाज आहे.

## गुळाच्या विक्रीवर इन्कमटॅक्स नाहीं

शेतकऱ्यानें त्याच्या शेतांतील उसापासून केलेल्या गुळाच्या विक्रीचें उत्पन्न इन्कमटॅक्स कायद्याच्या ४ (३) (viii) कलमांत बसून तें करमाफ ठरतें काय, ह्या महत्त्वाच्या प्रश्नाचा निवाडा मुंबई हायकोर्टानें नुकताच केला आहे.

कोल्हापूरचे श्री. चंद्रोबा गोविंद नरके, हे स्वतःच्या शेतांत ऊंस लावणारे बागाइतदार आहेत. १९५०-५१ आणि १९५१-५२ मध्यें त्यांनी स्वतःच्या शेतांतील उसाचा गूळ करून विकला, त्याचें त्यांना अनुक्रमें ५९,७५२ रु. व १,४५,५११ रु. मिळाले. ह्या उत्पन्नावर करमाफ आहे, असें त्यांनीं प्रतिपादून आपल्या पुष्ट्यर्थ इन्कमटॅक्स कायद्याचें ४ (३) (viii) हें कलम दाखविलें.

ट्रायब्यूनलनें हें उत्पन्न शेतीचें उत्पन्न ठरवून, त्यावर इन्कमटॅक्स घेतां येणार नाहीं. असें ठरविलें.

मुंबई हायकोर्टांत इन्कमटॅक्स खात्यानें हें प्रकरण नेलें तेव्हां, न्यायमूर्ती म्हणाले, "शेतकरी त्याच्या शेतांतील पीक विक्री करण्यास योग्य करण्याकरितां त्याचेवर जी क्रिया सामान्यतः करतो, तीच क्रिया श्री. नरके ह्यांनीं आपल्या पिकाच्या उत्पादित मालावर केली आहे काय?" असा प्रश्न येथें महत्त्वाचा आहे.

"श्री. नरके ह्यांचा ऊंस खाण्यालायक नव्हता; गूळ करण्याच्याच तो लायकीचा होता. त्या उसाला बाजारपेठ अशी नव्हती पण त्याचा गूळ केला तर त्याला बाजारपेठ मिळण्याजोगी होती.

"जेथें ऊंस पिकवण्यांत आला, तेथें बाजारपेठ नव्हती हें सिद्ध झाल्यानंतर, इन्कम् टॅक्स खात्यानेंच सिद्ध केलें पाहिजे, ...ीं दुसऱ्या एखाद्या बाजारपेठेंत ऊंस विकतां आला असता व तेथें ...ंस विक्रीसाठी नेणें अवघड नव्हतें. पण, असें सिद्ध ...न झाल्याकारणानें, श्री. नरके ह्यांना उसाचा गूळ करूनच ...ो विकावा लागला. तो करतांना शेतकरी सामान्यतः जी ...क्रिया करतात, तीच क्रिया त्यांनीं केली.

"म्हणून श्री. नरके ह्यांना गुळापासून मिळालेलें उत्पन्न ...तीचेंच उत्पन्न आहे व त्यावर इन्कमटॅक्स आकारतां येणार ...ीं." असा हायकोर्टानें निवाडा दिला.

**हैदराबाद सरकारला कर्ज**—आंध्र प्रदेशाच्या निर्मिती...तर हैदराबाद शहरांत सरकारी कचेऱ्यांसाठी लागणाऱ्या ...ागांची व रहात्या जागांची टंचाई भासणार आहे. ती दूर ...रण्यासाठी भारतीय सरकारनें आंध्र सरकारला ७५ लाख ...ांचें कर्ज देण्याचें सरकारनें कबूल केलें आहे. कर्जाचा ...योग करून नव्या इमारती बांधण्यांत येतील.

**भारतीय रेल्वेजवरील जबाबदारी**—रेल्वे बोर्डाचे अध्यक्ष ... पांडे ह्यांनीं दिल्ली येथें बोलतांना असे उद्गार काढले कीं, ...रतीय रेल्वेजनीं आपला विकास करतांना दुसऱ्या पंचवार्षिक ...जनेपुरताच विचार करून चालणार नाहीं; पुढील १५ ते २० ...त अंगावर घ्याव्या लागणाऱ्या जबाबदाऱ्यांचा विचारहि ...ांच केला गेला पाहिजे.

**...पुरुषांत आत्महत्त्या करणारांचें प्रमाण अधिक**—स्त्रियां...ा पुरुषांत आत्महत्त्या करणाऱ्यांचें प्रमाण अधिक आहे असा ...ाय जागतिक आरोग्य संघटनेनें आपल्या अहवालांत व्यक्त आहे. दरवर्षी २५ देशांत मिळून सुमारें पाऊण लाख स्त्री-...आत्मघात करून घेतात. असेंहि नमूद करण्यांत आलें आहे.

## वाटेंत गहाळ झालेला ड्राफ्ट

मुंबई येथील स्मॉलकॉजेस कोर्टांत श्री. बी. जी. पांडे, देवकरण नानजी बँक लि., आणि दि डेक्कन मर्चंटस् कोऑपरेटिव्ह बँक लि., यांचेवर श्री. एस्. एम्. याज्ञिक ह्यांनीं वाटेंत गहाळ झालेल्या आपल्या २,५०० रु. च्या ड्राफ्टबाबत लावलेला दावा न्या. मू. सी. एम्. परेख यांचे पुढें चालला.

दे. ना. बँकेच्या सोलापूर शाखेनें फिर्यादीच्या नांवचा मुंबई शाखेवर दिलेला ड्राफ्ट प्रतिवादी क्र. १ श्री. बी. जी. पांडे यांचेतर्फे दि डेक्कन मर्चंटस् को. बँक लि., या प्रतिवादी क्र. ३ नें दे. ना. बँकेच्या मुंबई शाखेंत ता. १८ एप्रिल, १९५३ रोजीं वटवला. फिर्यादीनें ड्राफ्ट गहाळ झाल्याची सूचना दे. ना. बँकेच्या मुंबई शाखेला १८ एप्रिलला दिली होती. पण बँकेचें म्हणणें असें कीं, ड्राफ्ट वटवला गेल्यानंतर सूचना मिळाली. बँकेच्या सोलापूर शाखेनेंहि ड्राफ्ट गहाळ झाल्याची खबर मुंबई शाखेला २० एप्रिल रोजीं दिली होती. असें असतांना देखील, दे. ना. बँकेच्या मुंबई शाखेनें प्रतिवादी क्र. ३ या बँकेला ड्राफ्ट गहाळ झाल्याचें न कळवल्यानें प्रतिवादी क्र. ३ नें प्रतिवादी क्र. १ ला सदर ड्राफ्टचे पैसे २१ एप्रिल रोजीं पावते केले.

फिर्यादीची सूचना डेक्कन मर्चन्टस् को. बँकेला न कळविण्याच्या हलगर्जीपणाबद्दल न्यायमूर्तींनीं दे. ना. बँकेला दोष ठेऊन फिर्यादीला ड्राफ्टची रक्कम देण्याचा हुकूम केला. त्याचप्रमाणें, डेक्कन मर्चंटस् को. बँकेला निगोशिएबल इन्स्ट्रुमेंट्स ॲक्टच्या १३१ व्या कलमाच्या आवश्यकतेप्रमाणें, योग्य तऱ्हेनें क्रॉस न केलेला ड्राफ्ट स्वीकारल्याबद्दल, फिर्यादीचे पैसे देण्यास तितकेंच पात्र ठरवलें आहे. त्यांनीं पुढें असेंहि म्हटलें आहे कीं, प्रतिवादी क्र. १ नें फिर्यादीची बनावट सही केल्यामुळें तो पैसे मिळण्यास अपात्र ठरतो. दाव्याचा खर्च प्रतिवादींनीं सोसण्याचा आहे.

## टागोरांच्या पुस्तकांचीं रशिअन रूपांतरें

रविंद्रनाथ टागोर ह्यांची "माऊंटन" ह्या कादंबरीचें रशिअन रूपांतर तयार होत आहे. त्याच्या ७५,००० प्रती छापण्यांत येतील. त्यांच्या 'दि लास्ट पोएम' च्या १,६५,००० रशिअन प्रती निघतील.

## सरकारी दुधाच्या नव्या बाटल्या

मुंबईच्या दूध ग्राहकांना आतां 'नव्या' बाटल्यांतून दूध मिळणार आहे. यासाठी नव्या बाटल्या तयार करण्यांत आल्या आहेत. याचें कारण आरे दूध कॉलनींतील दुधाच्या बाटल्यांची प्रतिकृति अन्यत्र खाजगी दूध डेअऱ्यांमधून करण्यांत येऊं लागल्यामुळें आणि या दूधबाटल्या सरकारी दुधाच्याच असल्याचें समजून गिऱ्हाईक फसतें, असें कळून आल्यामुळें ही नवी योजना सुरू करण्यांत येणार आहे. याबाबत गिऱ्हाइकांस डिसेंबरमध्यें सावधगिरीचा इशारा देण्यांत आला होता.

आतां नव्या बाटल्यांवर वासराच्या डोक्याचें रेखाचित्र कोरण्यांत आलें असून त्यावर 'आरे मिल्क' असें इंग्रजी व हिंदी भाषेंत लिहिलें आहे. या बाटल्या लवकरच अस्तित्वांत आल्यावर जुन्या बाटल्या रद्द करण्यांत येतील.

ही नवीन केलेली दुधाची बाटली १९११ च्या इंडियन पेटन्टस ॲंड डिझाइन ॲक्टखालीं रजिस्टर केली असून अशी 'नवी बाटली' तयार करणें अथवा वापरणें हा गुन्हा आहे.

## तीन नव्या खत-कारखान्यांची उभारणी

दुसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या मुदतींत उभारण्यांत यावयाच्या महत्त्वाच्या सरकारी मालकीच्या कारखान्यांत तीन खत-कारखान्यांची गणना होते. हे कारखाने उत्तरेंत नांगल येथें, पूर्वेकडील भागांत रुरकेला येथें आणि दक्षिणेंत निवेली येथें उभारण्यांत येतील.

याशिवाय सिंद्री येथील खत-कारखान्याची उत्पादनशक्ति जवळ जवळ ६० टक्क्यांनीं वाढविण्यांत येईल. या सर्व कार्यक्रमासाठीं सुमारें ६७ कोटी रुपये खर्च येईल असा अंदाज आहे. त्यामुळें देशांतील खत-उत्पादनशक्ति जवळ जवळ तिप्पटीनें वाढेल.

सिंद्री खत-कारखान्यांत खत उत्पादन ३१ ऑक्टोबर, १९५१ पासून सुरू झालें. या कारखान्यानें पांढरें खत पुरविल्यामुळें धान्यटंचाईशीं मुकाबला करण्यास फार साह्य झालें. या कारखान्यानें आतांपर्यंत सुमारें १२ लक्ष टन अमोनियम सल्फेटचें उत्पादन केल्यानें सुमारें ४० कोटी रुपयांची परकीय हुंडणावळीचा बचत होऊं शकली. खाजगी कारखान्यांतून तयार झालेल्या खताचाहि वरील पुरवठ्यास कांहीं प्रमाणांत पूरक उपयोग झाला.

तथापि, खताची मागणी वाढतच आहे. १९५५-५६ मध्यें भारतांत सुमारें २·२४ कोटी रुपये किंमतीच्या नायट्रोजनयुक्त व फॉस्फेटयुक्त खतांची आयात करावी लागली. १९५४-५५ मध्यें १·७९ कोटी रुपये किंमतीच्या खतांची आयात करण्यांत आली होती.

### जादा मागणी पुरी करणार

शेतजमिनीची उत्पादनक्षमता वाढविण्यासाठी खतांच्या पुरवठ्यांत वाढ करण्याची गरज आहे, हें दुसऱ्या योजनेंत ध्यानांत घेण्यांत आलें आहे. त्यासाठी खतांचे नवे तीन कारखाने काढून आणि सिंद्री खतकारखान्याचा विस्तार करून खताची सर्व मागणी पुरी करण्याची योजना आंखण्यांत आली आहे. दुसऱ्या योजनेंत अन्नधान्यांच्या उत्पादनाचें लक्ष्य वाढवावयाचें असल्यास खतांच्या उत्पादनाचें लक्ष्यहि वाढविलें पाहिजे. शेतें सुपीक करणारें सिंद्रीचें पांढरें खत हें कोळसा आणि जिप्सम या दोन खनिजांपासून तयार केलेलें असतें. दुसऱ्या योजनेच्या काळांत तर गॅस, पाणी आणि हवा यापासून नवीं खतें तयार करण्यांत येणार आहेत

सिंद्री खत-कारखान्यांतील कोक-भट्टींतून मिळणाऱ्या गॅसपासून खताचें जादा उत्पादन तेथें करण्यांत येणार आहे. रुरकेला येथें पोलादकारखान्यांतून मिळणाऱ्या गॅसपासूनहि खतें तयार करतां येतील किंवा कसें याची पहाणी करण्यांत येईल. नांगल येथील खत-कारखान्यांत, पाणी आणि हवा यांतून वीज खेळवून अमोनिया तयार करण्यासाठी ती द्रवरूप करण्यांत येईल व अणुशक्तीचा शांतताप्रधान कामासाठी उपयोग करून घेण्यासाठी लागणारें अणुजल तयार करण्यांत येईल.

प्रथम सिंद्री येथील नव्या विभागांत उत्पादनास प्रारंभ होईल. मार्च १९५८ पासून हें काम चालू होईल. या योजनेसाठी अंदाजें ११ कोटी रुपये लागणार असून त्यामुळें दररोज ७० टन युरियाचें आणि ४०० टन अमोनियम् सल्फेट-नायट्रेटचें उत्पादन होईल असा अंदाज आहे. याकरितां मूलभूत कच्चा माल म्हणून कोकभट्टीपासून मिळणारा सर्वच्या सर्व म्हणजे १० दशलक्ष घनफूट गॅस वापरण्यांत येईल. या नव्या कारखान्याची जागा व वीज, पाणी, इत्यादि प्राथमिक ... यांची सिद्धत झालेली आहे. या विभागाची यंत्रसामुग्री बसविण्याच्या कामा कंत्राट मे. मॉंटेकॅटिनी या इटालियन फर्मला दिलें आहे.

### पोलादाच्या ...उत्पादन खत

रूरकेला येथील पोलाद-कारखान्यांत तयार व्हावयाच्या एकू पोलादापैकी सुमारें तीन चतुर्थांश पोलादाचें उत्पादन एल. डी पद्धतीनें करण्यांत यावयाचें असल्यानें त्या ठिकाणीं खताचा कार खाना उभारणें शक्य झालें आहे. या पद्धतींत लोखंड शुद्ध करू घेण्यासाठी 'ऑक्सिजन' चा वापर करण्यांत येतो. येथें मोठ्य प्रमाणांत उपलब्ध होणाऱ्या नायट्रोजनचा उपयोग नायट्रोजन युक्त खतें तयार करण्यासाठी केला जाईल.

रूरकेला खत-कारखान्यांत ८०,००० टन फिक्स्ड नायट्रोज अगर ४,४२,००० टन नायट्रोजनयुक्त चुनखडी तयार होईल या योजनेस भांडवली खर्च सुमारें १५ कोटी रुपये येईल. य रकमेंत तेथें बसवावयाच्या शहराचा खर्च अंतर्भूत नाहीं. य कारखान्यांत १९५९ च्या मध्यापासून, म्हणजे पोलाद-कारखान चालू होण्याच्या सुमारास उत्पादनास प्रारंभ होईल.

मद्रास राज्याच्या दक्षिण अर्काट जिल्ह्यांतील लिग्नाइटच्य भव्य योजनेचा एक भाग म्हणून निवेली येथें खत-कारखान उभारण्यांत यावयाचा आहे. लिग्नाइटच्या खोदणीसंबंधीच प्राथमिक पाहणी, विशेषतः लिग्नाइटच्या थरासाठीं पाण्याचा दाब नियंत्रित करण्याच्या चांचण्या पुऱ्या हो आल्या आहेत व खाण-कामाच्या दृष्टीनें उपाय योजण्यां येत आहेत. या सर्व कामासाठीं तांत्रिक स्वरूपाचा सल्ला देण्य करितां प्रमुख परकीय फर्म्सशीं पत्रव्यवहार चालू आहेत. ह

या खत-कारखान्याच्या उभारणीसाठीं सुमारें १९ कोटी रुप खर्च येणार आहे. या रकमेंत पाणी वीज, इत्यादि प्राथमि गरजेच्या बाबतीच्या सोयीसाठी येणाऱ्या खर्चाचा समावेश नाहीं. य कारखान्यांत १९६० च्या अखेरीपासून उत्पादनास प्रारंभ होई या कारखान्यांत युरिया आणि अमोनिया सल्फेट-नायट्रेट तय होतील.

### नांगल योजना

सतलज नदीच्या पश्चिम कांठावर सध्यांच्या नांगल नगराच समोरील बाजूस नांगल खतकारखाना उभारण्यांत येईल. भा योजनेंतून मिळणाऱ्या जलविद्युतशक्तीचा येथें प्रमुख कच्चा म म्हणून वापर करण्यांत येईल. या कारखान्यांत प्रतिवर्षी २ लक्ष अमोनियम् नायट्रेट आणि ७ ते ८ टन अणुजल तयार करण्य येईल. त्यासाठी १,६०,००० किलोवॅट वीज वापरावी ला विजेच्या साह्यानें पाण्याचें विघटन करून आणि हवा द्रव करून अमोनिया तयार करण्यांत येईल. नांगल योजनेस अंदाजें २२ कोटी रुपये खर्च येईल. १९६० च्या प्रारंभापा येथें उत्पादनास सुरुवात होईल असा अंदाज आहे.

ही योजना कार्यवाहींत आणण्यासाठी चालू अस प्राथमिक कामाची बरीच प्रगति झालेली आहे. या दृ संबंधींचे प्राथमिक अहवाल तयार करण्याचें काम तीन पर फर्म्सकडे दिलें होतें. त्यांपैकी दोन फर्म्सनीं आपापल्या रि सादर केल्या आहेत. तिसऱ्या फर्मचा अहवाल लवकरच आल्यावर सप्टेंबरपर्यंत या तीनपैकीं एका फर्मची स सल्लागार म्हणून निवड करण्यांत येईल. नांगल-खत व्यवस्था पाहण्यासाठीं नांगल फर्टिलायझर्स ... ( प्रायव्हेट ) लि. या नांवाची संपूर्ण सरकारी ... मर्यादित कंपनी स्थापन करण्यांत आली आहे.

### उद्योगपतींना सरकारचा इशारा

भारतामधील अर्थव्यवस्था संमिश्र स्वरूपाची असल्यानें तींत खाजगी मालकीच्या उद्योगधंद्यांना योग्य स्थान देण्यांत आलेलें आहे. सरकारी मालकीच्या उद्योगधंद्यांचें क्षेत्र जसजसें वाढत जाईल, तसतसा एक नवीनच प्रश्न उद्भवू पाहत आहे. फेडरेशन ऑफ इंडिअन चेंबर्स ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्रीज ह्या संस्थेला भारतीय सरकारकडून आलेल्या परिपत्रकांत ह्या प्रश्नाचा उल्लेख करण्यांत आला आहे. पत्रकांत असें म्हटलें आहे कीं, सरकारी मालकीच्या उद्योगधंद्यांचा विकास होऊं लागल्यावर उच्च दर्जाचीं तांत्रिक कामें करणाऱ्या अधिकाऱ्यांची गरज वाढत जावी हें क्रमप्राप्तच आहे. अशा प्रकारचे तंत्रज्ञ आज खाजगी उद्योगधंद्यांतूनच अधिक असून सरकारलाच त्यांची वाण भासत आहे. खाजगी उद्योगधंद्यांतील कुशल तंत्रज्ञांना त्यांच्या मालकांच्या माहितीशिवाय व संमतीशिवाय सरकारी उद्योगधंद्यांत आणण्याचा प्रयत्न सरकार करीत नाहीं. निदान अशा लोकांना अधिक पगार देण्याचें प्रलोभन तरी सरकारनें दाखविलेलें नाहीं. उलट पक्षीं, सरकारच्या मालकीच्या उद्योगधंद्यांतील वरिष्ठ नोकरांना अधिक पगार देण्याचें आमिष दाखवून आणि सरकारशीं आधीं विचारविनिमय न करतां त्यांना खाजगी उद्योगधंद्यांत आणण्याचे प्रयत्न करण्यांत आल्याचीं कांहीं उदाहरणें सरकारच्या नजरेला आलीं आहेतच. असे प्रकार प्रमाणाबाहेर वाढले, तर सरकारला त्याविषयीं गंभीरपणें विचार करावा लागेल. खाजगी उद्योगधंद्यांच्या मालकांकडून एखाद्या सरकारी तंत्रज्ञाची मागणी करण्यांत आली आणि ती योग्य वाटली तर सरकारनें त्या अधिकाऱ्याला नोकरींतून मुक्त केलेलें आहे. पण सरकारला कळूं न देतां मात्र अशा हालचाली होता कामा नयेत.

### भारत आणि ब्रिटन ह्यांचे व्यापारी संबंध

भारत आणि ब्रिटन ह्यांच्यामधील व्यापारी संबंधाविषयीं एक छोटें पुस्तक फेडरेशन ऑफ ब्रिटिश इंडस्ट्रीज ह्या संस्थेतर्फे प्रसिद्ध करण्यांत आलें आहे. भारतामधील बाजारपेठेचें ब्रिटिश उद्योगधंद्यांना किती महत्त्व आहे, तें पुस्तकांत विशद करण्यांत आलें आहेच. पण उभयतां देशांतील व्यापारी संबंधांच्या भवितव्याबद्दल, त्यांच्या मार्गांतील अडचणींबद्दल आणि व्यापारी संधीबद्दलहि पुस्तकांत विवरण करण्यांत आलें आहे. ब्रिटनचीं जीं पहिलीं शहाजोग गिऱ्हाइकें आहेत, त्यांच्यांत भारताचा समावेश आहे. गेल्या वर्षी ब्रिटननें भारताला १३ कोटी पौंडांचा माल निर्यात केला. पुस्तक तयार करणारा लेखक हा भारतामध्यें नोकरी केलेल्या आय. सी. एस्. पैकी असून त्यानें स्वातंत्र्योत्तर काळांतहि भारताला बऱ्याच भेटी दिलेल्या आहेत. त्यानें असा अभिप्राय व्यक्त केला आहे कीं, भारताचें औद्योगीकरण जसजसें वाटचाल करूं लागेल, त्या प्रमाणांत उभयतां देशांतील व्यापाराची वृद्धि करण्यास अधिकाधिक संधि मिळेल. ब्रिटनच्या मालाला भारतीय बाजारपेठेंत येणारी मागणी वाढेल. कारण, भारतामधील जनतेचें राष्ट्रीय उत्पन्न वाढेल. परंतु ह्याचा अर्थ रोजखपाच्या वस्तु ब्रिटनला अधिक निर्यात करतां येतील, असा मात्र नव्हे. परकीय चलनाचा संचय करून तो योग्य त्या ठिकाणीं खर्च करण्याचें भारतीय सरकारचें धोरण असल्यामुळें अशा वस्तूंची आयात शक्य तितकी कमी करण्यांत येईल. भांडवली मालाची खरेदी करतां यावी म्हणून परकीय चलनाची जपणूक करण्यांत येईल आणि त्यासाठी आयातीवर निर्बंध घालणें, परवाना-पद्धति चालू ठेवणें, इत्यादि मार्गांचा पूर्णपणें उपयोग करण्यांत येत आहे.

५० वर्षांपेक्षा जास्त जनतेची सेवा करीत असलेलें मुंबईतील एक प्रसिद्ध निवासस्थान

★ सरदारगृह ★


प्रत्येक खोलींत स्वतंत्र बाथरूम व बाल्कनी
लग्नमुंजी वगैरे कार्यांची व भोजनपार्टींची कमी खर्चांत मनपसंत व्यवस्था
सभासंमेलनें यांची टिळक हॉलमध्यें सोय.
क्रॉफर्ड मार्केटजवळ, मुंबई २.

सांडू
प्रेग-युटेरो
गर्भिणी-गर्भ-रक्षक



दत्तात्रेय कृष्ण सांडू ब्रदर्स चेंबूर लि.
चेंबूर-मुंबई.

किर्लोस्कर
शेंगायंत्रें



या यंत्राकडून दर तासाला ७५ ते ८० पोतीं शेंग फोडली जात असून तें चालविण्यास ६ ते ८ अश्वशक्ति लागते. याशिवाय लहान प्रमाणावर हातानें व पॉवरवर चालणारीं यंत्रें मिळतात.
सविस्तर माहितीसाठी लिहा.

"कल्याण" पॉवर शेंगा यंत्र

किर्लोस्कर बंधु लि., किर्लोस्करवाडी

## वीज पुरवठ्याच्या सहकारी सोसायट्यांना आर्थिक साहाय्य

शेतीसाठी पाणीपुरवठा करण्याचे बाबतींत सहकारी वीजनिर्मिति संस्थांना स्वस्त दरानें वीजपुरवठा करतां यावा म्हणून त्यांना दुसऱ्या पंचवार्षिक योजनेंत आर्थिक साहाय्य करण्यांत येणार आहे. या सहकारी सोसायट्या दिवाबत्तीसाठीहि वीजपुरवठा करतील. ही मदत मुंबई राज्यांत ज्या भागांत इलेक्ट्रिक ग्रीड-योजना लागू नाहीं, त्या भागांतील सोसायट्यांना देण्यांत येईल.

सरकार अशा सोसायट्यांचे शेअर याअगोदरपासूनच घेत असून त्यांना भांडवली खर्चाच्या ½ इतकें कर्जहि देतें. परंतु त्यांना शेतीला पाणीपुरवठा करण्याकरितां वीजपुरवठा करण्याचें काम हातीं घ्यावें, असें वाटण्याइतकें हें साहाय्य पुरेसें नाहीं. शेतीसाठी पाणीपुरवठा करण्याकरतां जो वीजपुरवठा करण्यांत येतो त्याचें उत्पन्न उत्पादनाच्या खर्चापेक्षा कमी येतें असें आढळून आलें आहे. म्हणून अशी आर्थिक मदत देणें जरूर झालें आहे.

सध्यांच्या योजनेखालीं जें कर्जरूपानें साहाय्य देण्यांत येतें त्याशिवाय यापुढें, शेतीला पाणीपुरवठा करण्याकरतां जो वीज पुरवठा करण्यांत आला असेल त्याच्या भांडवली खर्चाच्या ½ इतकी रक्कम अनावर्तक आर्थिक मदत म्हणून देण्यांत येईल. १२ वीजनिर्मिति सोसायट्यांना त्यांच्या भांडवली खर्चाच्या ½ इतकें कर्जरूपानें साह्य देण्यांत येईल आणि त्यापैकी आठ सोसायट्यांना उपर्युक्त दरानें आर्थिक मदत देण्यांत येईल. यासाठी दुसऱ्या पंचवार्षिक योजनेंत कर्ज देण्याकरितां १४.०१ लाख रुपये आणि आर्थिक मदतीकरतां १.४० लाख रुपये याप्रमाणें तरतूद करण्यांत आली आहे.

चालू आर्थिक सालीं तीन युनिटांना कर्जरूपानें मदत करण्यांत येईल व त्यापैकी दोघांचा आर्थिक मदत देण्यासाठीहि विचार करण्यांत येईल. यासाठी अनुक्रमें रु. २.५० लाख आणि रु.०.७३ लाख अशी तरतूद करण्यांत आली आहे.

ज्यांना वीज उत्पादन आणि पुरवठा सोसायट्या काढावयाच्या असतील त्यांनीं १९१० च्या इंडियन इलेक्ट्रिसिटी कायद्याच्या कलम ३ खालीं लायसेन्ससाठी अर्ज करून तें मिळविलें पाहिजे आणि शेतीसाठी पाणीपुरवठा करण्याकरतां वीजपुरवठा करण्याच्या आपल्या योजनेच्या भागास मुंबई सरकारचे ॲग्रिकल्चरल इंजिनिअर पुणें यांची मान्यता घेतली पाहिजे.

कर्जावर दरसाल दर शेंकडा ४½ रुपये याप्रमाणें व्याज आकारण्यांत येईल. कर्जाची परतफेड १५ वार्षिक हप्त्यांनीं करावी लागेल.

**रशिआची नवी छोटी मोटार**—रशिआंतील मोटार-सायकली तयार करणाऱ्या एका कारखान्यानें नवीन प्रकारची छोटी मोटारगाडी तयार केली आहे. गाडींत दोन माणसें बसण्याची सोय असून तिचें वजन अवघें ८१५ पौंड आहे. ती जास्तींत जास्त ५० मैल वेगानें पळूं शकेल. एंजिन हवेनें थंड रहाणार आहे. एका गॅलन पेट्रोलवर ती १४५ मैल जाईल.

## राज्य सरकारांची नवी कर्जे उभारणी

| राज्य सरकार | लक्ष रु. | विक्रीची किंमत % रु. |
|---|---|---|
| (१) आंध्र ... | ६०० | ९९.८ |
| (२) बिहार ... | २०० | ९९.४ |
| (३) मुंबई ... | ७५० | १००.० |
| (४) हैद्राबाद ... | २०० | ९९.८ |
| (५) मध्यभारत ... | १०० | ९९.४ |
| (६) मध्यप्रदेश ... | १५० | ९९.४ |
| (७) मद्रास ... | १२५० | ९९-१२ |
| (८) म्हैसूर ... | ४०० | ९९.८ |
| (९) ओरिसा ... | ३०० | ९९.४ |
| (१०) पंजाब ... | २०० | ९९.४ |
| (११) राजस्थान ... | ३०० | ९९.८ |
| (१२) सौराष्ट्र ... | २५० | ९९.८ |
| (१३) त्रावणकोर-कोचीन ... | २०० | ९९.४ |
| (१४) उत्तर प्रदेश ... | ८०० | ९९.८ |
| (१५) प. बंगाल ... | ७०० | १००.० |

व्याजाचा दर : ४%

परत फेड : ३ सप्टेंबर, १९६८ (मुंबई सरकार ३ सप्टेंबर, १९७० रोजीं परतफेड करील.)

### दि सासवड माळी शुगर फॅक्टरी लि. नोकरवर्ग को. क्रे. सोसायटी लि., माळीनगर

अहवालाचे वर्षी सभासदांत ५४ ची भर पडली, वसूल शेअर-भांडवल ११,१८० रुपयांनीं वाढलें, ठेवींत १०,००० रुपयांची भर पडली, निव्वळ नफा १,१६४ रु. नें वाढून तो २,८१३ रु. झाला. दिलेल्या कर्जांत २९,६७१ रु. ची वाढ आहे. अशा रीतीनें, खेळतें भांडवल ५२,९७१ रु. चें ७५,५२७ रु. झालें आहे. शेअर्सवर ५% डिव्हिडंड देण्यांत येईल. (पदसिद्ध प्रेसिडेंट: हरिभाऊ बळवंत गिरमे; व्हा. प्रेसिडेंट व चेअरमन: ग. स. कारभारी; सेक्रेटरी: ना. गं. अंतरकर.

### दि पूना मर्चंट्स को. बँक लि.

अहवालाचे वर्षी वसूल भांडवलांत ४,६२० रु. ची. भर पडून तें १,०७,३६० रु. झालें. रिझर्व्ह व इतर फंड १,३२,९७४ रु. चे आहेत. ठेवींची रक्कम वाढली, त्या प्रमाणांत कर्जव्यवहारास अधिक रक्कम उपलब्ध झाली. चालू ठेवखात्यावर तात्पुरते ओव्हरड्राफ्टची सवलत देण्याचे दृष्टीनें एक पोटनियम सुचविण्यांत आला आहे. थकबाकीचें प्रमाण गतवर्षीपेक्षा २ टक्क्यांनीं कमी आहे. नफा ६,६५४ रु. झाला. ३½% दरानें डिव्हिडंड मिळेल. (चेअरमन: रा. ग. ठोसर; एजंट: भ. ग. साबणे.)

तमाम दंतरोगांवर
★ माकडछाप म्हणजेच काळी दूध पावडर ★

हें पत्र पुणें पेठ शिवाजीनगर घ. नं. ११५।१ आर्यभूषण छापखान्यांत केशव गणेश शारंगपाणी यांनीं छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए. यांनीं 'दुर्गाधिवास' ८२३ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.